दैनिक जनप्रवास • सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६

# राज्य विक्रीकर निरीक्षकपदी योगेश पाटील यांची निवड

**हेरले :** हेरले (ता. हातकणंगले) येथील योगेश अण्णासो पाटील यांनी राज्य विक्रीकर निरीक्षक पदाच्या




परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. योगेश पाटील यांचे शालेय व माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालय, रुकडी तसेच आदर्श गुरुकुल विद्यालय, पेठ वडगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे येथून त्यांनी बी.टेक. पदवी संपादन केली. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी राज्य विक्रीकर निरीक्षक पदाच्या परीक्षेत यश मिळविले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६

# शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे

- विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांचे प्रतिपादन
- विवेकानंदमध्ये स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण



स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करताना डॉ. अभयकुमार साळुंखे. सोबत कौस्तुभ गावडे, डॉ. सी. बी. पाटील, डॉ. विराज जाधव आदी.

जनप्रवास : कोल्हापूर

स्वातंत्र्य, समता, बंधूभाव, एकसंघ राष्ट्र व मानवतेचा संदेश देणाऱ्या घटनेने आपल्या देशाला सामाजिक सुरक्षितता, सहिष्णूता व स्थैर्य प्राप्त करुन दिले. एकात्मता ही भारताची शक्ती आहे. ही एकात्मता जपण्यासाठी प्रत्येक भारतीयाने प्रयत्न करायला हवा. ज्या मातीत जन्मलो त्याची कृतज्ञता व्यक्त करता आली पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी विश्वबंधूत्वाची शिकवण आपल्या प्रार्थनेतून दिली. त्याचे अवलंबन युवकांनी करावे, शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करुन आपल्या ज्ञानाची उंची वाढवावी असे प्रतिपादन विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे केले.

विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात ध्वजारोहण झाल्यानंतर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी शानदार परेड संचलन सादर केले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, डॉ. विराज जाधव, डॉ. कैलास पाटील, डॉ.अतिश पाटील, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. कविता तिवडे, डॉ. सुप्रिया पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी

**कोल्हापूर,** सोमवार, १७ ऑगस्ट २०२६

# 'एमपीएससी'च्या दुय्यम निबंधक परीक्षेत नीलेश सावंत राज्यात प्रथम

## विक्रीकर निरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी, दुय्यम निबंधक परीक्षांचा अंतिम निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुकामावाडी (पो. माजगाव, ता. पन्हाळा) येथील नीलेश लक्ष्मण सावंत यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेतलेल्या दुय्यम निबंधक श्रेणी-१ परीक्षेत राज्यात सर्वसाधारण प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकाविला. राज्य कर निरीक्षक परीक्षेत प्रतीक्षा विलास पाटील यांनी यश मिळवले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १७ मे २०२६ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५ परीक्षेतील राज्य कर निरीक्षक संवर्ग (२८०), दुय्यम निबंधक (८४) व सहायक कक्ष अधिकारी पदांचा अंतिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश संपादन केले.

पन्हाळा तालुक्यातील नीलेश सावंत हे सर्व सामान्य कुटुंबातील असून आई-वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांचे शालेय, माध्यमिक शिक्षण माजगाव येथे झाले. बीएस्सी पदवीचे शिक्षण न्यू कॉलेजमधून पूर्ण केले. त्यानंतर २०१९ 'एमपीएससी'चा अभ्यास सुरू केला. सहायक कक्ष अधिकारी म्हणून झालेल्या परीक्षेतही राज्यात पहिला क्रमांक मिळवला. सध्या ते सांगलीत उद्योग निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.



नीलेश सावंत



प्रतीक्षा पाटील

त्यानंतरही स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरूच ठेवला. नुकत्यात झालेल्या दुय्यम निबंधक परीक्षेत त्यांनी ४०० पैकी ३१७ गुण मिळून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. क्लास वन पद मिळविण्याचा मानस असल्याचे नीलेश यांनी सांगितले.

मूळ जेऊर (ता. पन्हाळा) येथील रहिवाशी असलेल्या प्रतीक्षा यांचे आई-वडील शेतकरी आहेत. प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर जेऊर येथे झाले. नववी ते बारावीपर्यंतचे शिक्षण देवाळे विद्यालय आणि त्यानंतर राज्यशास्त्र विषयातून विवेकानंद कॉलेजमधून बीएची पदवी घेतली. २०२१ ला स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. २०२४ झालेल्या परीक्षेत धर्मादाय आयुक्त कार्यालयात वरिष्ठ लिपीक म्हणून संधी मिळाली. त्यानंतरही स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू ठेवला आणि कर निरीक्षक परीक्षेत यश मिळविता आले. यावरच न थांबता राज्यसेवा परीक्षेचा अभ्यास करून क्लास वन अधिकारी होण्याचे स्वप्न असल्याचे प्रतीक्षा यांनी सांगितले.